REGISTERED No. B. 3434




# अर्थ

" अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १५ पुणें, बुधवार तारीख १६ नोव्हेंबर, १९४९ अंक ४४

दि
प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल
बँक लि.
( शिड्यूल्ड बँक )
प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग
पुणें २.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत, विक्रीस काढलेलें | | |
| व खपलेलें भांडवल | रु. | १०,००,००० |
| जमा झालेलें भांडवल | रु. | ७,१५,५२५ |
| खेळतें भांडवल | रु. | ७५,००,००० |

मुंबई शाखाः—कॉमनवेल्थ बिल्डिंग, ८२, मेडोज स्ट्रीट, मुंबई १

श्री. ग. रा. साठे, अध्यक्ष. श्री. दा. ग. बापट, उपाध्यक्ष.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

श्री. गो. धों. जोगळेकर, बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलएल. बी., मॅनेजर.
श्री. सी. टी. चितळे, मॅनेजिंग डायरेक्टर.

दि बेळगांव बँक लिमिटेड
हेड ऑफीस- बेळगांव
( दक्षिण महाराष्ट्र व मुंबई-कर्नाटक मधील पहिलीच शेड्यूल्ड बँक )

भांडवल

| | |
|---|---|
| खपलेलें व वसूल झालेलें शेअर भांडवल | रु. ५,९०,००० — |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | रु. १,२७,००० — |
| एकूण ठेवी | रु. ६०,००,०००चे वर |
| खेळतें भांडवल | रु. ७६,००,०००चे वर |

बँकेचीं वैशिष्ट्यें
१. चोख व काटकसरीची व्यवस्था.
२. ठेवींच्या व्याजाचे आकर्षक दर व सर्व वर्गांना परवडतील अशा नव्या योजना.
३. डिव्हिडंडची शाश्वती.
४. उत्तरोत्तर होणारी समाधानकारक व निश्चित प्रगति.
सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार चोख, काळजीपूर्वक व योग्य मोबदल्यांत केले जातात.

बँकेच्या इतर ठिकाणच्या शाखा
बेळगांव जिल्हा–संकेश्वर, नंदगड, अथणी, होसूर, चिकोडी, ठळकवाडी, गोकाक, निपाणी कँप, बैलहोंगल.
रत्नागिरी जिल्हा—वेंगुर्ला, शिरोडा, कणकवली, देवगड, मालवण, चिपळूण, सावंतवाडी.
धारवाड जिल्हा—धारवाड, नरगुंद.
विजापूर जिल्हा––रामदुर्ग
कोल्हापूर जिल्हा––गडहिंग्लज
दक्षिण सातारा जिल्हा––मिरज

विशेष माहितीसाठीं लिहा अगर वरीलपैकीं कोणत्याही शाखेंत चौकशी करा.

ह. सी. कुलकर्णी, बी. ए. मॅनेजर
गो. वि. सराफ, बी. ए., एलएल. बी. चेअरमन

तयार कपड्यांचे व्यापारी महिंद्रकर ब्रदर्स बुधवार चौक, पुणें

पांच हॉर्स पावरचें
डिझेल एंजीन
घ्यावयाचें म्हणजे तें किर्लोस्कर पीटरच! संपूर्ण पंपिंग सेटही मिळेल. चौकशी करा.
केळकर बंधू, बुधवार चौक, पुणें शहर.

## विविध माहिती

**बोलपटांची लांबी**—मद्रास सरकारनें दक्षिण हिंदुस्थानांत तयार होणाऱ्या चित्रपटांच्या लांबीसंबंधीं मध्यवर्ती सरकारकडून खास विचार व्हावा अशी विनंती केली होती. चित्रपटांची लांबी ११,५०० फुटांपेक्षां जास्त असूं नये, ह्या मध्यवर्ती सरकारच्या शिफारसीला इतर सर्व प्रांतांनीं आपली अनुमति दर्शविली असल्यानें मद्रास सरकारनेंही ती अमलांत आणावी असें हिंद सरकारकडून कळविण्यांत आलें आहे.

**रेल्वेच्या उपयोगाबद्दल सोन्यांत मोबदला**—गेल्या महायुद्धांत इराणमधील रेल्वे वापरण्याबद्दल इंग्लंडनें इराणला सोन्याच्या रूपांत मोबदला देण्याचें ठरविलें आहे, असें समजतें. उभय राष्ट्रांत होऊं घातलेल्या करारान्वयें इराणला ५७,००,००० पौंड रक्कम ब्रिटनकडून मिळणार आहे. ह्या रकमेपैकीं ६० टक्के रक्कम सोन्याच्या रूपांत देण्यांत यावयाची आहे. पौंडाची किंमत उतरविण्यापूर्वी हा करार झाला असल्यानें मोबदल्याची खरी किंमत आतां सुमारें ७९,००,००० पौंड होते.

**जागतिक बँकेचा नफा**—जागतिक बँकेचें फडणिशी वर्ष ३० सप्टेंबरला संपलें. ह्या वर्षाच्या पहिल्या तीन महिन्यांत बँकेला ३१,६९,९८० डॉलर्स निवळ नफा झाला. बँकेनें आपल्या व्यवहारांना १९४६ सालीं प्रारंभ केला. तेव्हांपासून बँकेला १,६८,०४,०७४ डॉलर्स निवळ नफा झाला. ह्याशिवाय खास गंगाजळींत टाकलेली ९४,०९,७३४ डॉलर्स ही रक्कम वेगळीच आहे. बँकेच्या ३० सप्टेंबरला संपलेल्या तिमाहींत एकूण उत्पन्न ७३,१५,६९७ डॉलर्स झालें. त्यापैकीं १३,२५,५९४ डॉलर्स खास गंगाजळींत टाकण्यांत आले.

**फुलपाखरांचें प्रदर्शन**—झूलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिया तर्फे कलकत्ता येथें एक फुलपाखरांचें जंगी प्रदर्शन भरविण्यांत येणार आहे. ह्या प्रदर्शनांत उत्तम रीतीनें जतन केलेले ५४,००० फुलपाखरांचे नमुने ठेवण्यांत येणार आहेत. फुलपाखरांच्या निरनिराळ्या रंगांच्या व आकारांच्या ४,००० जाती वर्गीकरण करून मांडण्यांत येतील. आशिया खंडांत भरणारें अशा प्रकारचें हें पहिलेंच प्रदर्शन आहे.

**मुंबई प्रांताची लोकसंख्या**—मुंबई प्रांतांत संस्थानांचें विलीनीकरण झाल्यामुळें प्रांताची लोकसंख्या ८६ लाखांनीं आणि क्षेत्रफळ २७,६९९ चौरस मैलांनीं वाढलें आहे. प्रांतांतील जिल्ह्यांची संख्या २० ची २८ वर गेली आहे; तालुक्यांची संख्या १९८ होती ती ३०९ झाली आहे; आणि खेडेगावांची संख्या २२,७१२ होती ती ३६,३१५ झाली आहे. प्रांताच्या झालेल्या ह्या पुनर्घटनेमुळें बहुतेक सर्व जिल्ह्यांच्या सरहद्दीही बदलल्या आहेत.

**फ्रेंच स्वयंपाक्यांना भाव आला**—ब्रिटनमध्यें परदेशीय प्रवाशांच्या आगमनास उत्तेजन मिळावें म्हणून १० हजार ब्रिटिश स्वयंपाक्यांच्या बदला १० हजार फ्रेंच स्वयंपाकी ब्रिटनमध्ये आणावें असें सुचविण्यांत आलें आहे. फ्रेंच लोक ब्रिटिश स्वयंपाक्यांनीं तयार केलेलें अन्न खाण्यास तयार होतील कीं नाहीं अशी शंका व्यक्त करण्यांत आली असता, ब्रिटिश आचारी फ्रान्समध्यें शिकाऊ उमेदवार म्हणून जाणार असल्याचें सांगण्यांत आलें. फ्रेंच स्वयंपाक्यांपासून ब्रिटिश स्वयंपाकी पाकशास्त्र शिकले तर ब्रिटनच्या डॉलरच्या उत्पन्नांत अधिक भर पडेल असा अंदाज करण्यांत आलेला आहे.

**मद्रास प्रांतांतील विजेच्या कंपन्या**—विजेच्या कंपन्यांना नुकसान-भरपाई देऊन त्यांचें राष्ट्रीयीकरण करण्याची व्यवस्था करणारें एक बिल मद्रास सरकारनें प्रसिद्ध केलें आहे. प्रांतांत एकूण ८० विजेच्या कंपन्या असून त्या ताब्यांत घेण्यासाठीं एकूण ३ कोटी रुपये नुकसान-भरपाई दाखल द्यावे लागतील असा अंदाज आहे. नुकसान-भरपाईची तीन चतुर्थांश रक्कम आगाऊ आणि बाकीची नुकसान-भरपाईचा आंकडा नक्की ठरल्यावर, देण्यांत यावयाची आहे.

**यांत्रिक हत्यारांचा कारखाना**—हिंदुस्थान सरकार शिमोगाजवळ मशीन टूल्सचा एक कारखाना काढण्याच्या विचारांत असल्याचें समजतें. ह्या कारखान्याचा एक विभाग शिमोगाच्या जवळ आणि दुसरे दोन विभाग बंगलोरजवळ उघडण्यांत यावयाचे आहेत.

**जगांतील दुधाचें उत्पादन**—जगांतील दुधाचें उत्पादन आतां युद्धपूर्व काळाच्या ९० टक्क्यापर्यंत आलें आहे. हिंदुस्थानांतील गाई आणि दुधाचें उत्पादन ह्यासंबंधीं फारशी माहिती उपलब्ध नाहीं. तथापि हिंदमधील दुधाचें उत्पादन १·८ कोटी टन असावें असा अंदाज करण्यांत आला आहे. हा अंदाज खरा असला तर हिंदुस्थानचा दुधाच्या एकूण उत्पादनांत तिसरा क्रमांक लागतो.

**६२ दिवसांत पिकणारें धान्य**—रशिआंतील वनस्पतिशास्त्रज्ञांनीं संशोधन करण्यासाठी एक दौरा नुकताच काढला होता. ह्या प्रवासांत त्यांनीं ४०० निरनिराळ्या प्रकारचीं धान्यें नैसर्गिक स्थितींत असलेलीं गोळा केलीं. त्यांत ६२ दिवसांत पिकणारें एका प्रकारचें धान्य त्यांना उपलब्ध झालें आहे, असें समजतें.

**पृथ्वी उष्ण होत चालली!**—नोबेल पारितोषक मिळविणारे अणुशास्त्रज्ञ डॉ. युरे ह्यांनीं आपल्या एका व्याख्यानांत असें सांगितलें कीं, पृथ्वी उत्पन्न झाली तेव्हां ती थंडगार होती. नंतर लक्षावधी वर्षांच्या काळांत ती हळूहळू तापत चालली. ही क्रिया अशीच चालू राहिली तर पृथ्वीच्या पाठीवर डोंगरांच्या नव्या रांगा उत्पन्न होण्याचा संभव आहे.

### शुभेच्छा

आपल्या पंडित नेहरूंनीं सर्व आयुष्य अत्युच्च दर्जाच्या बहुमोल देशसेवेसाठी खर्चलें आहे. पंडितजींना अधिक प्रमाणांत अधिकाऱ्यांचें व जनतेचें हार्दिक व कार्यक्षम सहकार्य लाभून प्रगतीच्या मार्गांतील अनिष्ट कांटे दूर व्हावे आणि पंडितजींचा भार हलका व्हावा; त्याचप्रमाणें त्यांना दीर्घायुरारोग्य लाभावें असें आम्हीं त्यांच्या ६० व्या वाढदिवसानिमित्त चिंतितों.

# अर्थ

बुधवार, ता. १६ नोव्हेंबर, १९४९





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## कंपनी कायद्यांत नियोजित दुरुस्ती

( २ )

### डायरेक्टरांची जबाबदारी वाढणार ?

सध्याची बोर्ड ऑफ डायरेक्टर्सची नियंत्रणाची व देखरेखीची पद्धति कार्यक्षम नसून निष्प्रभ आहे. कंपनीची व्यवस्था मॅनेजिंग एजंटाकडे असली, तरी सर्वसाधारण देखरेख व नियंत्रण डायरेक्टरांकडेच असणें आवश्यक आहे. गैरव्यवस्था, दुष्कृत्यें आणि कायद्याच्या तरतुदींचा भंग ह्यांचे बाबत मॅनेजिंग एजंटाप्रमाणें डायरेक्टरांसहि जबाबदार धरण्यांत यावें असा सरकारचा अभिप्राय आहे. प्रत्येक पब्लिक व खासगी कंपनीस डायरेक्टर असावेत, असें म्हणून, खालीलप्रमाणें सूचना करण्यांत आल्या आहेतः—

( १ ) कंपनी उभारणें, अस्तित्वांत आणणें किंवा तिची व्यवस्था पहाणें ह्या संबंधांत एखाद्यास शिक्षा झाली असल्यास किंवा व्यापारांतील खोटेपणाबद्दल, कंपनींतील अफरातफरीबद्दल अथवा कंपनीबाबत तिचा अधिकारी ह्या नात्यानें कर्तव्यच्युतीबद्दल त्यास शासन झालें असल्यास त्याला कंपनीच्या व्यवस्थेत ५ वर्षांपर्यंत भाग घेण्यास प्रतिबंध करण्याचा अधिकार कोर्टास असावा. ( २ ) डायरेक्टरास कर-माफ वेतन दिलें जाऊं नये. ( ३ ) कोणत्याहि डायरेक्टरास आपली जागा दुसऱ्यास असाइन करतां येऊं नये, फार तर स्पेशल ठरावानें असा अधिकार दिला जावा. ( ४ ) डायरेक्टर व मॅनेजिंग एजंट ह्यांचे नांवावर किती शेअर्स आहेत, त्यांचा पगार, पेन्शन इ., अधिकारीवर्गास दिलेलीं कर्जें, देणेकरी व सभासद ह्यांचेशीं केलेल्या तडजोडी, इत्यादि बाबत डायरेक्टरांनीं ताळेबंदांत अथवा नफातोटापत्रकांत खुलासा अवश्यमेव केला पाहिजे. ( ५ ) डायरेक्टरास त्याची जागा गेल्याबद्दल नुकसान भरपाई दाखल रकम देण्यांत येऊं नये. दिलीच तर देण्यापूर्वीं त्याचा तपशील भागीदारांना कळविला पाहिजे व त्याबाबत स्पेशल ठराव झाला पाहिजे. ( ६ ) ८६ फ व ९१ अ ह्यांतील तरतुदीविरुद्ध करार 'व्हॉइडेबल' होतील म्हणजे त्यांचें बंधन तोडतां येईल. ८६ फ ह्या कलमाचा भंग केल्यास डायरेक्टरांस १००० रु. पर्यंत दंड होऊं शकेल व बोर्डांतून ५ वर्षांपर्यंत त्याची हकालपट्टी कोर्ट करूं शकेल. ( ७ ) ८६ फ मध्यें सांगितलेले करार १०,००० रु. वरील असल्यास, भागीदारांच्या स्पेशल ठरावानें त्यांस मंजुरी घ्यावी लागेल. ( ८ ) ज्या कंपन्यांशीं डायरेक्टरांचा संबंध आहे, अशांना कर्जें देण्याबाबत निर्बंध संस्थानांत नोंदलेल्या, त्याप्रमाणें खासगी कंपन्यांनाहि लागू करण्यांत यावेत. ( ९ ) प्रत्येक डायरेक्टराच्या निवडणुकीचें मतदान व्यक्तिशः, स्वतंत्रपणें केलें जावें. ( १० ) ७० वर्षांवरील वयाच्या डायरेक्टरांची निवड करतां येऊं नये; स्पेशल ठरावानें सवलत देतां येईल. ( ११ ) प्रत्येक खासगी कंपनीस किमान एक तरी डायरेक्टर असावा. ( १२ ) कोणत्याहि डायरेक्टराची निवड ( पब्लिक व खासगी, सर्व कंपन्यांत ) त्याच्या लेखी संमतीविना केली जाऊं नये. ही संमती राजिस्ट्राकडे नोंदविण्यांत यावी. ( १३ ) ८६ इ ह्या कलमाखालीं सेक्रेटरीची जागा ही किफायतीची जागा ('ऑफिस ऑफ प्रॉफिट') समजण्यांत येऊं नये. ( १४ ) कोणाहि डायरेक्टरानें लेखी राजीनामा दिला तर त्याची जागा खाली होईल; बोर्ड ऑफ डायरेक्टर्सनीं त्याचा विचार किंवा स्वीकार करण्याची आवश्यकता नाहीं. ( १५ ) नियुक्ती किंवा लायकी ह्या संबंधांत मागाहून कांहीं दोष आढळले तरी डायरेक्टर अथवा मॅनेजर ह्यांनीं केलेलीं कामें कायदेशीर समजण्यांत येतील. ( १६ ) आपलें स्वतःचें वय कंपनीस कळविण्याची जबाबदारी डायरेक्टरांवर आहे. ( १७ ) कंपनीच्या व्यवस्थेंत हात असणारांना प्रतिबंध करण्याचा अधिकार कोर्टास राहील. ( १८ ) प्रत्येक डायरेक्टराचे नांवावर कंपनीमध्यें किती शेअर्स अथवा डिबेंचर्स आहेत त्यांच्या संख्येचा व रकमेचा तपशील व त्यांच्या खरेदी–विक्रीचा तपशील, तारीख, किंमत, इ. देणारें पुस्तक कंपनी अद्ययावत राखील. ( १९ ) कंपनीनें तिच्या अधिकाऱ्यांस दिलेल्या कर्जांचा तपशील हिशेबांत नमूद केला पाहिजे. ( २० ) वरील सर्व बाबींत खुलासा करण्याची डायरेक्टरांची सर्वसाधारण जबाबदारी राहील. ( २१ ) मॅनेजिंग एजन्सीचा करार कांहींही असला तरी कंपनीचा मॅनेजिंग एजंटानें केलेला खर्च, त्यानें कंपनीचे गुंतविलेले पैसे, कंपनीसाठी उभारलेलें कर्ज, ह्या बाबतींत नियंत्रणाचा व देखरेखीचा डायरेक्टरांचा निर्णायक अधिकार राहील. हें नियंत्रण व देखरेख ह्या विषयीं कसूर झाल्यामुळें कंपनीस नुकसान आलें तर तें डायरेक्टरांनीं भरून दिलें पाहिजे. ८७ व ते ८७ आय हीं मॅनेजिंग एजंटाबाबत कलमें आहेत त्यांचा भंग झाल्यास डायरेक्टरहि दाव्यास व शिक्षेस पात्र होतील. ( २२ ) दोन प्रतिस्पर्धी डायरेक्टरांच्या गटांत कंपनी चालविण्याची व्यवस्था हातीं घेण्याचे बाबत वांधा आल्यास, डिस्ट्रिक्ट कोर्ट 'समरी' पद्धतीनें त्याचा निवाडा करील.

### भांडवलाची रचना व भागीदार आणि डायरेक्टर ह्यांचा तपशील

अधिकृत भांडवल व वसूल भांडवल ह्यांचेमध्यें हल्ली पुष्कळच तफावत आढळून येते; त्याचप्रमाणें भागीदारांना दिलेल्या मताधिकारांतही एकवाक्यता नसते. हे दोष टाळण्यासाठी व कंपन्यांची योग्य मार्गानें वाढ व्हावी, ह्याकरितां खालील सुधारणा सुचविण्यांत आल्या आहेतः—( १ ) प्रत्येक एक हजार रुपयांच्या अधिकृत भांडवलास २ रु. नोंदणी फी आकारण्यांत यावी; ह्या दरानें जी आकारणी होईल ती केली जावी; कमाल मर्यादा कोणतीहि नसावी. सध्या, ५० हजारांवरील अधिकृत भांडवलास प्रत्येक १० हजार रुपयांस ५ रु. फी घेतली जाते आणि १० लाखांवरील प्रत्येक १० हजार रुपयांस फक्त १ रु. फी आहे. ( २ ) बँकिंग कंपन्यांचें खपलेलें भांडवल त्यांच्या अधिकृत भांडवलाच्या किमान निम्में पाहिजे आणि वसूल भांडवल खपलेल्या भांडवलाच्या किमान निम्में पाहिजे, असा कायदा आहे. सर्वच कंपन्यांना ही अट लागू

करावी. (३) बँकिंग कंपन्या वगळून बाकी सर्व कंपन्यांचें भांडवल प्रेफरन्स, ऑर्डिनरी व डिफर्ड भागांचें असलें तरी चालेल. (४) आर्टिकल्समध्यें कांहींहि नमूद केलेलें असो व शेअर्स कोणत्याहि प्रकारचे असोत, भागीदारांनीं भरणा केलेल्या भांडवलाचे प्रमाणांतच त्यांना मताधिकार मिळाला पाहिजे. (५) आर्डिनरी भागांस ज्या दरानें डिव्हिडंड दिलें जाईल, त्याच्या दुपटीपेक्षा जास्त दरानें डिव्हिडंड डिफर्ड भागांस मिळूं शकणार नाहीं. प्रेफरन्स भागांना मिळावयाच्या डिव्हिडंडचा दर एक ठराविक कोणता तरी निश्चित असेल. (६) ह्या सर्व योजना अंमलांत आणण्यास जुन्या कंपन्यांना दोन वर्षांचा अवधि देण्यांत यावा. (७) कांहीं कंपन्यांच्या गटांतील शेअर्स एकमेकांत गुंतलेले असतील, तर त्या शेअर्सचें होणारें वर्तुळ शेअर रजिस्टरमधून वगळलें जावें. (८) शेअर अर्ज व शेअर ट्रॅन्स्फर अर्ज ह्यांत भागीदार कोणत्या देशाचा नागरिक आहे तें नमूद करण्यांत यावें व तें शेअर रजिस्टरमध्यें नोंदण्यांत यावें. (९) शेअर रजिस्टरमध्यें व इ फॉर्ममध्यें वडिलांचें नांव देण्याचें कारण नाहीं, परंतु स्त्रियांचे बाबतींत मात्र वडिलांचें किंवा पतीचें नांव आवश्यक असावें. इ फॉर्ममधील जातींसंबंधीं माहिती अनावश्यक आहे. (१०) इ फॉर्ममध्यें डायरेक्टरांचें नागरिकत्व व तो इतर कोणत्या ठिकाणीं डायरेक्टर आहे तें वर्षांतून एकदा नोंदण्यांत यावें, परंतु जुने डायरेक्टर कमी झाले किंवा नवे घेण्यांत आले, तर हा बदल ठराविक मुदतींत कळविण्यांत यावा. (११) इ फॉर्ममध्यें भागीदारांची माहिती तीन वर्षांतून एकदा दिली तरी पुरे, परंतु सर्व बदल व वाढ हीं दरवर्षी दाखविण्यांत यावीं.

## अन्नधान्याचा उठाव

परदेशांतून धान्य आणण्याचें प्रमाण शक्य तितकें कमी करण्याचें धोरण हिंद सरकारनें स्वीकारलेलें आहे. अशा परिस्थितींत आयात झालेल्या अन्नधान्याचा उपयोग वांटप पद्धतींत योग्य प्रकारें केला जातो कीं नाहीं हें पहाणें अगत्याचें आहे. बृहन् मुंबईंत वांटपांत समाविष्ट असलेल्या अन्नधान्याचा उठाव १९४९ च्या जानेवारी ते जुलै पर्यंत कसा झाला त्याचा तक्ता खालीं दिला आहे.

दर डोई, दर महिना खपलेलें धान्य

(आंकडे पौंडांचे)

| | लोकसंख्या | तांदूळ | गहूं | मिलो व बार्ली | एकूण बेरीज |
|---|---|---|---|---|---|
| जानेवारी | ३७,३८,९०३ | ९.६२ | ६.८३ | २.४३ | १८.८८ |
| फेब्रुआरी | ३७,७७,८८० | ५.६५ | ५.७३ | ४.९१ | १६.२९ |
| मार्च | ३४,१६,९९७ | ६.९४ | १३.३५ | ०.९४ | २१.२३ |
| एप्रिल | ३५,७४,५३२ | ६.३८ | ९.५९ | २.५४ | १८.५१ |
| मे | ३७,१०,५३५ | ६.३८ | ९.५९ | २.३९ | १८.३६ |
| जून | ३६,७१,४८३ | ४.७३ | १०.३५ | २.३५ | १७.४३ |
| जुलै | ३६,९८,२८६ | ५.७९ | ९.६६ | २.४७ | १७.९२ |

दर माणशीं सगळ्यांत जास्ती एकूण खप मार्चमध्यें आणि सगळ्यांत कमी खप फेब्रुआरीमध्यें झाल्याचें शेवटच्या स्तंभावरून दिसून येतें. सर्वसाधारणपणें असें दिसतें कीं, अन्नधान्याच्या खपाची सर्वांत लहान एकूण मासिक सरासरी १८.५ पौंडाच्या आसपास होती. दरमाणशीं दरदिवशीं १२ औंसांचा शिधा धरला तर, जितकें अन्नधान्य घ्यावयाची परवानगी आहे, त्याच्या ८० टक्केच प्रत्यक्ष खप आहे असें आढळतें. आयात होणाऱ्या खर्चिक अन्नधान्याच्या, प्रांतांकडून ज्या मागण्या येतात, त्या निष्कारण फुगवलेल्या असूं नयेत, ह्या दृष्टीनें वरील अनुभवाचा विचार करणें अवश्य आहे.

## राष्ट्रीय नियोजनांत सहकारी शेतीचें स्थान

### श्री. वैकुंठराय मेहता ह्यांचे लखनौ परिषदेवरील विचार

संयुक्त-राष्ट्र-संघटनेच्या अन्न व शेती संघटनेतर्फे सहकारी चळवळीविषयीं एक परिषद नुकतीच लखनौ येथें भरविण्यांत आली होती. ह्या परिषदेचे अध्यक्ष मुंबई सरकारचे अर्थमंत्री श्री. वैकुंठराय मेहता हे होते. परिषद आटोपल्यानंतर श्री. मेहता ह्यांनीं तद्संबंधीं आपले विचार मुलाखतीच्या द्वारें व्यक्त केले. त्या विचारांपैकीं कांहीं महत्त्वाचा भाग पुढें दिला आहे. श्री. मेहता म्हणाले:—

"इंडोचायना आणि सयामसारख्या देशांतून सहकारी चळवळीचें स्वरूप वेगवेगळें आढळून येतें; तथापि दोन्ही देशांतील सरकारें ग्रामीण जीवनाची सहकारी तत्त्वावर पुनर्घटना करावी ह्या मताचीं आहेत. शेतीची पुनर्घटना सहकारी दिशेनें करण्यासाठीं विचार-विनिमय करणारी संयुक्त-राष्ट्र संघटनेतर्फे भरविण्यांत आलेली ही पहिलीच परिषद होती. ह्या पूर्वी आंतरराष्ट्रीय सहकारी संस्थांतर्फे सहकारी परिषदा भरविण्यांत आलेल्या होत्या. परंतु, आग्नेय आशियांतील आणि अतिपूर्वेकडील सरकारांच्या प्रतिनिधींनीं भाग घेतलेली परिषद ही बहुधा पहिलीच असावी. ही परिषद हिंदुस्थानांत भरविली जावी हेंही योग्यच होतें.

"औद्योगिक सहकारी संस्था व ग्रामोद्योगाचे मोठाल्या उद्योगधंद्यांशीं असलेले संबंध ह्या दोन्हीं विषयांचा परिषदेंत उहापोह करण्यांत आला. संयुक्त राष्ट्र-संघटनेतर्फे सहकारी शेतीसंबंधीं एक विस्तृत योजना परिषदेपुढें मांडण्यांत आली होती. ह्या योजनेंत २३ निरनिराळ्या देशांतील सहकारी चळवळींचा आढावा घेण्यांत आला होता. वरील दोन्ही विषयासंबंधीं परिषदेनें ज्या शिफारसी संमत केल्या आहेत, त्यांची परिषदेंत भाग घेतलेल्या सरकारांना चांगली मदत होईल असा मला भरंवसा वाटतो. त्या शिफारसींच्या अनुरोधानें ह्या सरकारांना आपली शेती-सहकाराविषयीं धोरणें ठरवितां येतील. ह्या परिषदेच्या कामांत संयुक्त प्रांत सरकारनें बरेंच लक्ष घातलें. संयुक्त प्रांतांतील जमीनदारीची पद्धत लवकरच नष्ट होणार आहे. ती नाहींशी झाल्यानंतर शेतकऱ्यांची संघटना करण्यांत सहकारी तत्त्वांचा आश्रय करण्याचा संयुक्त प्रांत सरकारचा विचार आहे. परिषदेला जी प्रतिनिधी मंडळें आलीं होतीं त्यांचा परस्परांना चांगला उपयोग झाला. राष्ट्रीय आर्थिक नियोजन आणि अंतर्गत प्रश्न ह्या दोन्ही बाबतींत सहकारी चळवळ काय करूं शकेल, ह्याची कल्पना प्रतिनिधी मंडळांना एकमेकांच्या विचारविनियमानें आली.

"आग्नेय आशिआंतील सहकारी चळवळींविषयीं आस्था असणाऱ्या सर्वांना एकत्र जमविण्याचें कार्य परिषदेनें केलें. ब्रह्मदेश आणि इंडोनेशिआ ह्या राष्ट्रांना आपले प्रतिनिधी पाठवितां आले नाहींत, हें वैगुण्य मात्र परिषदेंत राहिलेंच. तथापि ब्रह्मदेशानें तद्देशीय सहकारी चळवळींच्या सद्यःस्थितीविषयीं एक तपशीलवार अहवाल पाठविला होता. आर्थिक आणि दैनंदिन कारभारविषयक साह्य देऊन, सहकारी शेतीचा विकास करण्याचा जो कार्यक्रम मुंबई सरकारनें आंखला आहे, त्याबद्दल प्रतिनिधींनीं बरेंच कुतूहल व्यक्त केलें."

## साखरेच्या संरक्षणाची फेर-चौकशी

### साठे बिस्किट व चॉकोलेट कं. लि., पुणें, २. यांनीं टॅरिफ बोर्डाचे प्रश्नपत्रिकेस पाठविलेलें उत्तर.

हिंदी साखरेची किंमत ईतर कांहीं देशांतील साखरेच्या किंमतीपेक्षां जवळ जवळ तिप्पट आहे. उदा:—ब्राझील व अर्जेंटिना २॥ आणे पौंड, यु. एस. ए. ३॥ आणे, ग्रेट ब्रिटन ३॥ आणे व स्वित्झर्लंड ३। आणे. जोपर्यंत चॉकोलेट व तत्सम पदार्थांच्या आयातीस बंदी होती तोंपर्यंत पक्क्या मालाच्या अंतर्गत व्यवहारांपुरती साखरेची किंमत विचारांत घेण्याइतकी महत्त्वाची नव्हती. पण आयातीवरील निर्बंध उठतांच साखरेच्या भारी दरामुळें हिंदी मालाची ( विशेषतः चॉकोलेटची ) मागणी अतिशय कमी झाली.

#### संरक्षण इष्ट

भारताच्या एकंदर आर्थिक परिस्थितीचा विचार केल्यास जावा किंवा अर्जेंटिना या देशांतून आयात केलेल्या साखरेस पडणारी किंमत व भारतांत साखर धंद्यांतील कार्यक्षम संस्थेस उत्पादनास लागणारा सरासरी खर्च यांमधील फरकाइतका संरक्षक कर बसवून साखर धंद्यास कांहीं अंशीं तरी संरक्षण देणें इष्ट आहे.

याखेरीजः—

( १ ) स्वतःचे उपयोगासाठीं उसाची लागवड करणारे साखर कारखाने व खास कारखान्यासाठीं उसाची लागवड करणारे शेतकरी यांच्यावरील ऊंस उत्पादनाचे क्षेत्र मर्यादेवरील निर्बंध दूर करण्यांत यावेत.

( २ ) साखर कारखान्यांना गूळ करण्याची बंदी करण्यांत यावी.

( ३ ) मोलॅसेसची वाहतूक व योग्य विनियोग करण्यास मदत करावी.

( ४ ) जेथें कोळशाची किंमत स्वस्त असेल तेथें चिपाडापासून पुठ्ठा तयार करण्यास उत्तेजन द्यावें.

( ५ ) साखर कारखान्यांना स्वतःस लागणाऱ्या पुरेशा उसाचें उत्पादन स्वतः करणेस उत्तेजन द्यावें. यामुळें उसाचे दर एकरी उत्पादन वाढविण्याचे सुसंघटित प्रयत्न करणें शक्य होईल. या करतां साखर कारखान्यांना सध्यां ऊस उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांकडून जमीनी खंडानें मिळवून द्याव्या व यामुळें निर्माण होणारा असंतोष टाळण्यासाठीं सरकारनें गेल्या पांच वर्षांत शेतकऱ्यांना झालेलें उत्पन्न विचारांत घेऊन त्यांच्या शेतीवरील खंड ठरवावा व त्याची दर १० अगर २० वर्षांनीं फेर-पहाणी करावी. साखर कारखानदारांनीं उसाची लागवड केल्यास जास्त पैदास होते, हें दक्षिणेंतील अनुभवावरून सिद्ध झालें आहे.

#### साखरेवर अवलंबून धंदे

साखर धंद्यास संरक्षण चालू असेपर्यंत साखरेवर अवलंबून असणाऱ्या धंद्यांसः

( १ ) साखरमिश्रित आयात मालावरील आयात कर जरूर तितक्या प्रमाणांत वाढवून, व

(२) आस्ट्रेलियाप्रमाणें साखरमिश्रित निर्यात पदार्थांस प्रमाणशीर आर्थिक सहाय्य देऊन नुकसानभरपाई करावी.

ज्या ग्राहकांची साखरेची मागणी एकाच वेळीं १ वॅगन इतक्या मालाची असेल त्यांना परस्पर साखर कारखान्यांतून ठराविक दरानें साखर मिळण्याची व्यवस्था करावी. कारण त्यामुळें निष्कारण दलालांच्या खिशांत जाणारा फायदा टाळतां येईल.

सर्व साधारण हिंदी साखर बऱ्या प्रतीची आहे. साखरेच्या आयातीस परवानगी मिळून व्यापारी चढाओढ सुरू झाल्यावर हिंदी साखरेच्या दर्जांत आणखी सुधारणा होऊं शकेल. साखरेची प्रतवारी करून प्रत्येक प्रतीचें परिमाण ( स्टॅन्डर्ड ) ठरविणें आवश्यक आहे. त्याचप्रमाणें साखरेच्या कारखान्यांना साखरेच्या पोत्यावर आंतील साखरेच्या प्रतीचा उल्लेख करावयास भाग पाडण्यांत यावें. साखर कारखान्यांनीं स्वतःस लागणाऱ्या उसाची पैदास स्वतःच केल्यास दक्षिणेंतील कारखान्याप्रमाणेंच साखरेचा हंगाम ६ ते ७ महिनेपर्यंत वाढवितां येईल व त्यामुळें विना-उत्पादन मुदत कमी होऊन अशा मुदतीकरितां साठवावा लागणारा साखर साठा-सध्यांचे मानानें कमी होईल.

#### बँकिंगच्या व इतर सवलती

बँकिंगच्या जरूर त्या सवलती व हंगामानंतरच्या काळांत साखरेच्या भावांत थोडीशी वाढ करण्यास परवानगी दिल्यास साखर कारखाने व सिंडिकेट यांना हंगामानंतरच्या काळाकरितां पुरेसा साखर साठा करणें शक्य होईल. आर्थिक मदत सध्या अस्तित्वांत असलेल्या बँकांकडून मिळण्याची व्यवस्था व्हावी किंवा लॅन्ड मॉर्टगेज बँकांच्या धर्तीवर फक्त साखर कारखान्यांना त्यांच्या साखरेच्या साठ्याच्या तारणावर आर्थिक मदत देणारी एखादी नवी बँक काढावी. इंडस्ट्रियल फिनॅन्स कॉर्पोरेशनला सुद्धां हा प्रश्न हातीं घेणें शक्य आहे. अशा तऱ्हेच्या सवलती मिळाल्यानंतर व्यापाऱ्यांमधील साठेबाजीच्या प्रवृत्तीला आळा बसेल. सध्यां कांहीं साखर कारखाने जरूर तें आर्थिक साहाय्य मिळविण्यासाठीं हंगामाच्या सुरवातीसच व्यापाऱ्यांशीं सौदे करतात असें समजतें. अशामुळें साठेबाजीची प्रवृत्ति वाढीस लागते, तीस आळा घालणें आवश्यक आहे.

साखर कारखानदारांचे सिंडिकेटस् स्थापना करण्यास उत्तेजन देण्यांत यावें. कारण त्यामुळें उत्पादन नियंत्रण व विक्री सुलभ होईल. पण सर्व भारतासाठीं एकच सिंडिकेट स्थापन न करितां साखरेचें उत्पादन करणाऱ्या व समान परिस्थिती असलेल्या निरनिराळ्या विभागांसाठीं स्वतंत्र सिंडिकेटस् स्थापन करावयात. उदा:—संयुक्त प्रांतांत एक, बिहारमध्यें एक व दक्षिण भारतांत एक. अशा प्रत्येक विभागांतील उसाच्या पिकाची पारस्थिति व उत्पादन खर्च विचारांत घेऊन साखरेच्या कमाल किंमती ठरविण्यांत याव्यात, यामुळें प्रत्येक विभागांतील कारखान्यांची स्थानिक विक्रीची किंमत वेगवेगळी राहूं शकेल व वाहतुक खर्च कमी होऊन योग्य चढाओढीस अवसर मिळेल.

#### सुवर्णमध्य पाहिजे

योग्य त्या परिमाणांत साखरेची आयात करावी. पण साखरेचा साठा किंवा चणचण यामुळें होणाऱ्या भावांतील चढउतार टाळण्यासाठीं आयात वर्षभर कमी-अधिक प्रमाणांत चालू ठेवावी. आयातीचें परिमाण इतपत ठरवावें कीं, देशांतील उत्पादन अधिक आयात, मिळून एकंदर मागणीपेक्षां ५ ते १० टक्के अधिक व्हावें.

थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे, साखरेच्या धंद्यास संरक्षण देतांना साखरेवर अवलंबून असणाऱ्या इतर धंद्यांना व सर्व साधारण जनतेस तें बाधक होणार नाहीं, अशा तऱ्हेनें द्यावें व नियंत्रण व खुला व्यापार यांमधील सुवर्णमध्य सांधण्यांत यावा.

—×—

## खेडेगांवांत बँकिंगचा प्रसार कसा होईल.

### ठाकूरदास कमिटीची नेमणूक

खेडोंपाडीं बँकांच्या सोयी उपलब्ध करून देण्यासाठीं कोणत्या प्रकारचें सरकारी साह्य देतां येईल ह्यासंबंधीं विचार करून अहवाल सादर करण्यासाठीं हिंदुस्थान सरकारनें एक कमिटी नेमली आहे. सर पुरुषोत्तमदास ठाकूरदास ह्यांना तिचें अध्यक्ष म्हणून नेमलें आहे. इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशनचे दुय्यम मॅनेजिंग डायरेक्टर श्री. व्ही. आर. सोनाळकर ह्यांचीही कमिटीवर नेमणूक करण्यांत आली आहे. कमिटीनें आपला अहवाल ता. १५ फेब्रुआरीचे आंत सादर करावयाचा आहे. कमिटीनें पुढील मुद्यांबाबत आपल्या शिफारसी करावयाच्या आहेत.

(१) खेडोंपाडीं बँकांच्या सवलती मिळवून देण्यासाठी ताबडतोब करतां येण्यासारखे उपाय सुचविणें.

(२) तालुका निहाय व जिल्हा निहाय सरकारी तिजोऱ्यांचें आणि पोटतिजोऱ्यांचें रोकडीच्या व्यवहाराचें काम सध्यां ज्या प्रकारानें चालतें, तें कमिटीनें निरीक्षावें. जेथें इंपिरिअल बँकेच्या मार्फत हें काम चालतें त्याचीही तपासणी करावी.

(३) जेथें इंपीरिअल बँकेची शाखा नसेल तेथें हें काम एखाद्या व्यापारी अगर सहकारी बँकेकडे सोंपवावें किंवा काय? किंवा त्यासाठी एखादी नवीन सरकारी बँकच काढावी? व्यापारी अगर सहकारी बँकांकडे हें काम सोंपविण्याचें झाल्यास त्यांच्यावर कोणत्या अटी घालण्यांत याव्या, आणि त्यांना सरकारनें कशा प्रकारें साह्य करावें?

(४) सांप्रत भिन्नभिन्न संस्थानांत अगर संस्थानी-संघांत ज्या बँका हें काम करीत आहेत, त्यांच्याबाबत कोणतें धोरण स्वीकारावें?

(५) ह्याशिवाय इतर कांहीं सूचना करावयाच्या असल्यास त्या कमिटीनें कराव्यात.

वरील मुद्यांबाबत कोणास कमिटीला सूचना करावयाच्या असल्यास त्या कमिटीच्या सभासद-चिटणिसांकडे, (c/o रिझर्व्ह बँक ऑफ इंडिआ, मुंबई) ह्या पत्त्यावर ३० नोव्हेंबरच्या आंत पाठवाव्या.

खेडेगांवांतून बँकिंगचा फैलाव कसा होईल, ह्याचा विचार दीर्घ काळ चालू आहे आणि त्या मानानें प्रत्यक्ष फळ फारच थोडें आलेलें आहे. शहरी बँकांना खेडेगांवांतून शाखा उघडणें खर्चाच्या दृष्टीनें परवडत नाहीं आणि आतां तर व्यवस्था खर्च वाढतच चाललेला आहे. ज्या शाखा किफायतशीर होत नाहींत, त्या चालू ठेवणें बँकांना शक्य होत नाहीं. साहजीकच, सरकारनेंच ह्या बाबतींतील नुकसान कांहीं काळ तरी सोसलें, तरच बँका खेडेगांवांतून शाखा उघडण्यास तयार होतील. मुंबई प्रांतांत सहकारी बँकांना अशा प्रकारची मदत सरकारनें केलेली आहे आणि तिचा फायदा घेण्यांत आलेला आहे. वास्तविक, खेड्यांतून बँकिंगचा प्रसार करण्याचा प्रश्न ह्यापूर्वी कांहीं काळ हातीं घेतला असता, तर तो अधिक फलदायी झाला असता. खेडेगांवांतील जनतेला बँकिंगची व बचतीची संवय लावतांना, तेथील लायक लोकांच्या कर्जाची गरजहि भागविण्यांत आली पाहिजे. सहकारी संस्था-इतकें इतर संस्था हें दुहेरी काम नीट करूं शकणार नाहींत. आज रिझर्व्ह बँक व तिच्या नियंत्रणाखालील बँकांचें जाळें ह्यांचा खेडेगांवांतील पतीच्या व्यवहारांशीं निकटचा संबंध जोडला गेलेला नाहीं. तो कसा जोडतां येईल, हाहि महत्त्वाचा प्रश्न आहे. खेडेगांवांतील सध्यांची परिस्थिति १८ वर्षांपूर्वी बँकिंग कमिटीच्या चौकशीच्या वेळेचे मानानें पुष्कळच बरी आहे, परंतु बँकिंगच्या चौकटींत ती कशी आणतां येईल हा प्रश्न फार बिकट आहे.

उद्‌बोधक उद्‌गार

## कंपनी कायद्याची दुरुस्ती स्थगित करा

"हिंदी कंपनी कायद्यांत सरकारनें ज्या दुरुस्त्या सुचविल्या आहेत, त्या धक्का देणाऱ्या आहेत. मॅनेजिंग एजन्सीची पद्धत जवळ जवळ नष्टच करण्याचा बेत दिसतो. वास्तविक, मॅनेजिंग एजंटांनीं भारताच्या औद्योगिक प्रगतीस चांगला हातभार लावला आहे. नामवंत फर्म्सनीं कित्येक चहाच्या, तागाच्या, कापडाच्या, साखरेच्या व इतर धंद्यांत यश मिळविलें आहे. सध्याच्या आर्थिक परिस्थितींत कारखानदारांचा विश्वास कमी होईल असें कांहींहि करण्यांत येऊं नये. सध्याच्या मॅनेजिंग एजटांचे जागीं दुसरी कोणती पद्धति भारतांत उपलब्ध आहे काय? सरकारनें आर्थिक परिस्थिति स्थिरावेपर्यंत आपल्या सूचना स्थगित कराव्यात." फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीचे अध्यक्ष, श्री. के. डी. जालन.

## साखरेचें उत्पादन वाढणार नाहीं; किंमत स्वस्त होणार नाहीं.

"सध्या गुळास फारच आकर्षक किंमत येत असल्यानें, ज्या उंसाची वास्तविक साखर व्हावयाची, त्याचा आतां गूळ होणार, हें उघड आहे. त्या:कारणानें महाराष्ट्रांतील साखर कारखान्यांचें उत्पादन चालू मोसमांत वाढणें अशक्य आहे. चालू वर्षी साखरेचें उत्पादन वाढेल, असा अंदाज कोणत्या आधारावर केलेला आहे तें कांहीं समजत नाहीं. महागाई भत्ता व बोनस ह्यांच्या वाढीमुळें कामगारांच्या वस्तींत साखरेस मागणीहि वाढली आहे. हाताशीं जास्त पैसा, वाढती मागणी, रेल्वेनें होणारी सोपी वहातूक आणि उत्पादनांत अपुरी वाढ, ह्या सर्व गोष्टींकडे सरकारनें दुर्लक्ष केलेलें आहे. गेल्या वर्षी इतकीच मागणी राहिली, तर सबंध हिंदुस्थानभर पुरवठा मागणी पुरी पाडूं शकणार नाहीं. संयुक्तप्रांत आणि बिहार येथें उंसास दर मणी १ रु. १० आ. किंमत दिली जाते. १९३९-४० मध्यें ती ६ आणे होती. ह्या वर आधारलेली साखर स्वस्त होण्याची शक्यता दिसत नाहीं." शुगर फॅक्टरीज असोसिएशनचे चेअरमन, मि. डब्ल्यू. जेंकिन्स, ह्यांचें ता. १४ नोव्हेंबर रोजीं झालेल्या वार्षिक सभेंतील भाषण.

### मोठ्या कुटुंबांतील मुलें कमी बुद्धिमान?

एडिंबरो विद्यापीठांतील एका शिक्षणतज्ज्ञानें असें मत व्यक्त केलें आहे कीं, मोठ्या कुटुंबांतील मुलें सर्वसामान्यपणें लहान कुटुंबांतील मुलांच्या पेक्षां कमी बुद्धिमान असतात. उच्च विद्याभ्यासामुळें विद्यार्थ्यांना उशिरा लग्नें करावीं लागतात आणि त्यामुळें त्यांचीं कुटुंबें बेताचीं रहातात असाही अभिप्राय त्यांनीं व्यक्त केला.

### विद्यार्थ्यांनो, परदेशीं जाऊं नका.

भारत सरकारनें सर्व विद्यापीठांच्या उपकुलगुरूंना एक पत्रक धाडून अशी सूचना केली आहे कीं, अमेरिकेसारख्या दुर्लभ चलनाच्या देशाला विद्याभ्यासासाठी जाण्यापासून विद्यार्थ्यांना परावृत्त करण्यांत यावें. एखाद्या शिक्षणक्रमाची देशांत अगर सुलभ चलनाच्या देशांत सोयच नसेल तरच त्या प्रकारच्या विद्याभ्यासासाठीं विद्यार्थ्यांनीं परदेशीं जावें, अशी सरकारची इच्छा आहे.

### जी. जी दांडेकर मशिन वर्क्स लि., भिवंडी

वरील कंपनीनें ३० जून, १९४९ अखेरच्या वर्षी सुमारें ८ लक्ष रुपयांची यंत्रसामुग्री विकून २,११,५०२ रु. ठोक नफा मिळविला. गेल्या वर्षापेक्षा विक्री १ लक्ष, ६१ हजारांनीं ज्यास्त झाली आहे. ३९½ हजार रु. घसारा काढून व ३० हजार रु. कामगारांसाठी बोनसची तरतूद करून निव्वळ नफा ६७,५४७ रु. उरला. ऑर्डिनरी भागांस करमाफ ६% डिव्हिडंड मिळणार आहे. कंपनीच्या स्टॉकची किंमत, पडलेल्या किंवा बाजारभावानें, जी कमी असेल तिनें, हिशेबांत घेतलेली आहे. ह्या कंपनीचें वैशिष्ट्य असें, कीं तिला इतर कित्येक कंपन्यांप्रमाणें रोख पैशाचा तुटवडा कधींच पडलेला नाहीं व तिचे २½ लक्ष रु. सरकारी रोख्यांत आहेत. त्याचप्रमाणें, तिचें वसूल भांडवल ४½ लक्ष रु. असून ठेवींची रक्कम ७० हजारहि नाहीं. काटकसरीनें, किफायतशीरपणें व कार्यक्षमतेनें तिचा कारभार चालू आहे. (चेअरमनः श्री. वा. पु. वर्दे, बी. कॉम.; मॅनेजिंग एजंटसः मेसर्स दांडेकर इंजिनिअर्स लि.– सोल डायरेक्टरः श्री. गो. ग. दांडेकर)

### रशिआचा पंचवार्षिक कार्यक्रम

रशिआनें आपला युद्धोत्तर पंचवार्षिक कार्यक्रम मुदतीच्या आधीं संपविला असल्याचें जाहीर केलें आहे. जगांत आतां रशिआ हें पहिल्या प्रतीचें औद्योगिक आणि शेतकीच्या व्यवसायाचें राष्ट्र झालें आहे, असा दावा करण्यांत आला आहे. १९४९ च्या मध्याच्या सुमाराला रशिआंतील उत्पादन १९४० च्या उत्पादनाच्या मानानें ४१ टक्के वाढलें. युद्धापूर्वींही रशिआच्या औद्योगिक प्रगतीचा वेग सर्वांत अधिक होता असें म्हणतात.

### इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशनला मॅनेजर हवा

इंडस्ट्रिअल फिनॅन्स कार्पोरेशन ऑफ इंडियानें मॅनेजरच्या जागेसाठी अर्ज मागविले आहेत. जागेचा पगार १०००–५०–१२०० आहे. उमेदवार हा विद्यापीठाचा पदवीधर असून त्याला १२ वर्षांचा बँकिंगचा प्रत्यक्ष अनुभव असावा आणि त्यानें शेड्यूल्ड बॅंकेंत मॅनेजरचें काम नुकतेंच केलेलें असावें, अशी अपेक्षा आहे.

### सरकारी नोकरांची सक्तीची बचत

मध्यवर्ती सरकारी नोकरांसाठी सक्तीची बचतीची योजना भारत सरकारनें जाहीर केली आहे. खालील तक्त्याप्रमाणें त्यांनीं प्रॉव्हिडंट फंडांत रक्कम टाकली पाहिजे. ही योजना १ डिसेंबर १९४९ ते १ मार्च १९५२ पर्यंत अंमलांत राहील.

| पगार (रु.) | सक्तीची बचत |
|---|---|
| २५१ ते ५०० | रुपयांत १½ आणा |
| ५०१ ते १,००० | २ आणे |
| २,००१ ते ३,००० | ३ आणे |
| ३००० चे वर | ३½ आणे |

### बँकांच्या संघाची स्थापना

महाराष्ट्रांतील बँकांची एक असोसिएशन स्थापन करण्याचा प्राथमिक विचारविनिमय करण्यासाठी गुरुवार, ता. १७ नोव्हेंबर दिवशीं सायंकाळीं ५ वाजतां पु. सें. को. बँकेच्या दिवाणखान्यांत सभा भरणार आहे. श्री. म. व्यं. शिंगरे (भोर स्टेट), जी. आर. साठे (प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल), मुरलीधर सी. लोहिया (बँक ऑफ पुना), डी. के. साठे (महाराष्ट्र), बी. बी. वाळवेकर (भारत इंडस्ट्रिअल) ह्या अध्यक्षांच्या निमंत्रक म्हणून सह्या आहेत.

## The Bombay Provincial Cooperative Bank Ltd.

The Board of Directors of the Bombay Provincial Co-operative Bank, Ltd., have decided to issue 38643 additional shares of Rs. 50 each. Each share is of the face value of Rs. 50 as before and is offered at a premium of Rs. 10 per share, that is at the rate of Rs. 60 per share, to be paid in one instalment. Applications in the form prescribed for additional shares are invited from existing shareholders, cooperative institutions as well as the public. All such applications should be sent so as to reach this Office or any of its Branches on or before the 15th December 1949.

In allotting shares, preference will be given to the present shareholders of the Bank and to Co-operative Institutions as well as the staff of the Provincial Bank. Allotment of new shares will be made by the Board of Directors and their decision will be final and binding. Application monies received for shares, if not allotted by the Board, will be refunded as soon as possible after allotment and shall not carry any interest. The shares allotted under this issue will carry the same rate of dividend *pro rata* as sanctioned to the shareholders for the old issue with effect from 1st January 1950.

The Government of Bombay have kindly consented to take up all the shares now offered to the public but remaining unsubscribed in pursuance of Government Resolution No. 2148/45 dated the 25th June 1948.

Dated: 12th November 1949.

**V. P. Varde,**
Managing Director.

## –औद्योगिक सेक्रेटरींचा ट्रेनिंग क्लास–

नाशिक जिल्ह्यांतील औद्योगिक सोसायट्यांच्या सेक्रेटरींसाठीं मागील स्थगित झालेला क्लास पुन्हां ता. २०–११–४९ पासून एक महिना मुदतीचा चालू होणार आहे. तरी ज्या उमेद्वारांस सदर शिक्षण घ्यावयाचें असेल त्यांनीं खालील सही करणार इसमाकडे ता. २०–११–४९ चे आंत अर्ज करावेत. (मात्र मागील दिलेल्या अर्जदारांनीं समक्ष हजर राहावें, पुन्हां अर्ज करूं नयेत.) अर्जासोबत क्लास फी रु. ३ पाठवावी. उमेद्वाराचें शिक्षण व्ह. फा. पर्यंत घेतलेलें पाहिजे. उमेद्वारांस शिक्षण स्वखर्चानें घ्यावें लागेल. उमेद्वारांनीं "नाशिक डिस्ट्रिक्ट इंडस्ट्रिअल को–ऑपरेटिव्ह असोसिएशन लि., बॉम्बे आग्रा रोड, पितृप्रभा, ऑफिसांत" ता. २०–११–४९ रोजीं, रविवारीं, दुपारीं १२ वाजतां हजर व्हावें.

मे. एक्स ऑफिशिओ सेक्रेटरी डि. को. बोर्ड, नाशिक, यांचे-मार्फत रवाना.

एन. वाय. कुलकर्णी
को-ऑपरेटिव्ह ट्रेनिंग इन्स्पेक्टर,
नाशिक
(घर नं. २१७८, मधली होळी)

वाचकांचा पत्रव्यवहार

## सहकारी खरेदी-विक्री संघावर व्यापाऱ्यांचा बहिष्कार

मी कोपरगांव तालुक्यांतील टाकळी गांवचा रहिवाशी आहे. कोपरगांव ही गुळाची मोठी पेठ आहे. गुळाचा हंगाम सुरू झाला आहे. पण शेतकऱ्यांपुढें मोठा पेंचप्रसंग निर्माण झाला. सहकारी सोसायट्यांच्या शेतीमालाची विक्री करण्याकरितां व शेतीस लागणारा माल पुरविण्याकरितां एक सहकारी खरेदी-विक्री दुकान आहे. त्या दुकानावर कोपरगांव येथील व्यापाऱ्यांनीं बहिष्कार पुकारून त्या दुकानांतील माल खरेदी करण्याचें व त्या दुकानाला लागणारा माल पुरविण्याचें बंद केलें आहे. त्यामुळें विशेषतः शेतकी सोसायट्यांच्या सभासदांचें अत्यंत नुकसान होत आहे व होणार आहे. हा बहिष्कार आज वर्ष होऊन गेलें तरी चालू आहे. सहकारी खरेदी-विक्री संघाचे चालक दुकान चालविण्याचे कसोशीनें प्रयत्न करीत आहेत. पण ही स्थिति चालू राहाणें सरकार, शेतकरी व व्यापारी यांच्या दृष्टीनें घातक आहे. चौकशी अंतीं असें कळतें कीं, दोन वर्षांपूर्वी कोपरगांव सहकारी खरेदी-विक्री संघानें गूळ डिस्पॅचचे बाबतींत सरकारला जी मदत केली त्याचा हा परिणाम आहे. सहकारी दुकानावर बहिष्कार घातला म्हणजे शेतकऱ्यांचा माल आपलेच दुकानीं विक्रीस येईल व मग तो कमी भावानें घेतां येईल व कमीशनही मारतां येईल, अशी कांहीं स्वार्थी आवकवाल्या व जावकवाल्या व्यापाऱ्यांची भावना आहे. म्हणून त्यांनीं जोर धरला आहे. व्यापारी लोकांच्या जर कांहीं रास्त तक्रारी सहकारी संघाविरुद्ध असतील तर त्यांनीं त्यांच्या नियमांनुसार लवाद अगर कोर्टदरबार करून त्याची दाद लावून घ्यावी. पण बहिष्कार हा त्यावर तोडगा किंवा उपाय नव्हे, असें वाटतें. तरी सरकारनें या बाबतींत लक्ष घालून ही कोंडी फोडावी.

मुक्काम टाकळी, तारीख २७-१०-४९ — आपला, एक शेतकरी.

### पुणें पोस्टल को. बँकेंत श्री. पोतदारांचें व्याख्यान

"पगारदारांच्या सहकारी सोसायट्या" ह्या विषयावर पुणें पोस्टल को. बँक लि. मध्यें सहकारी सप्ताहांत ता. ३१ ऑक्टोबर, १९४९ रोजीं श्री. दा. वा. पोतदार ह्यांचें व्याख्यान झालें.

### महाराष्ट्र सहकारी विद्यालयांत सहकारी दिन

महाराष्ट्र सहकारी विद्यालय, पुणें येथें श्री. बापूसाहेब गुप्ते ह्यांच्या अध्यक्षतेखालीं सहकारी दिन साजरा झाला. त्यावेळीं श्री. ग. र. तुळशीबागवाले, श्री. श्री. वा. काळे, श्री. एन. व्ही. नायक, ह्या पाहुण्यांचीं व संस्थेंतील कांहीं विद्यार्थ्यांचीं समयोचित भाषणें झालीं.

### नगर डि. अ. सें. को. बँकेंत सहकारी दिन

नगर डि. अ. सें. को. बँकेंत कलेक्टर श्री. रा. चिं. जोशी ह्यांच्या अध्यक्षतेखालीं, जिल्हा सहकारी दिनोत्सव समितीतर्फे सहकारी दिन साजरा झाला. त्यावेळीं वक्तृत्वाच्या चढाओढी ठेवण्यांत आल्या होत्या.

### कल्याण पीपल्स को. बँकेचा सहकार दिन

कल्याण पीपल्स को. बँकेतर्फे सहकार दिन ता. १३ नोव्हेंबर रोजीं मुंबई प्रांताचे सहकार मंत्री श्री. निंबाळकर ह्यांच्या अध्यक्षतेखालीं साजरा झाला.


वैद्यकर मसाले वापरा

'अर्थ' ग्रन्थमाला.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

भोर स्टेट बँक लि.
मुख्य कचेरी:-भोर, जि. पुणें.
शाखा:-पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ६७,००० |

बोर्ड ऑफ डायरेक्टर्स
श्री. म. त्र्यं. शिंगरे, अध्यक्ष. — न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब य. द. खोले. — श्री. चं. रा. राठी.
श्री. के. वि. केळकर, एम्. ए., एलएल. बी. — श्री. बा. ग. धंडुके.
बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.
पुणें कचेरी ५१५ बुधवार — अधिक माहितीसाठी लिहा. रा. गो. आगाशे, बी. ए. (ऑ.) मॅनेजर.

Dr. Waman Gopal's Sarsaparilla
BEST BLOOD PURIFIER

उंची कपड्याचा व स्नानाचा उत्तम साबण
निर्मल सोप
दि माणिक सोप वर्क्स, कराड (साता...


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.